विशेष सहाय्य योजनेच्या दिव्यांग
लाभार्थ्यांसाठी निधी वितरित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग सक्षमीकरण विभाग,**
**शासन ज्ञापन क्रमांकः : दिव्यांग-२०२६/प्र.क्र.२९/कार्यासन-६**
**मंत्रालय, मुंबई**
**दिनांक : २४ ऑगस्ट, २०२६**

**वाचा :**

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय क्र विसयो-२०२६/प्र.क्र.०६/विसयो दि.२४ फेब्रुवारी, २०२६
२. दिव्यांग सक्षमीकरण विभागाचा शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२६/प्र.क्र.२३/कार्यासन ६, दि.२३ मार्च, २०२६
३. दिव्यांग सक्षमीकरण विभागाचा शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०२६/प्र.क्र.२३/कार्यासन ६, दि.०६ एप्रिल, २०२६
४. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.०९ एप्रिल, २०२६.
५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.पुरक-२०२६/प्र.क्र.६१/अर्थ-३ दि.०३ जुलै, २०२६.

**शासन ज्ञापन :-**

विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांचे कामकाज दिनांक १ एप्रिल, २०२६ पासून दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून हाताळण्यात येत आहे. सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता पात्र दिव्यांग लाभार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

**(रक्कम रुपये हजारात)**

| अ.क्र. | योजनेचे नाव / लेखाशीर्ष / संगणक सांकेताक | सन २०२६-२७ साठी एकूण मंजूर तरतूद (पुरवणी मागणीसह ) | DBT खात्यात वर्ग करावयाचा निधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ६ |
| १ | २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण,१०१-दिव्यांगांचे कल्याण, ०९-दिव्यांग व्यक्तींना अनुदान, (०९)(०१) संजय गांधी दिव्यांग निराधार अनुदान योजना कार्यक्रम (२२३५ ई०२१) | | |
| | २०- इतर प्रशासकीय खर्च | ७७००.००० | ६१६.००० |
| | ३१ - सहायक अनुदाने (वेतनेतर) | १४२३५३९०.००० | १३११५६९.७०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण,१०१-दिव्यांगांचे कल्याण, ०९-दिव्यांग व्यक्तींना अनुदान, (०९)(०२) श्रावण बाळ सेवा दिव्यांग राज्य निवृत्तीवेतन योजना कार्यक्रम (२२३५ ई०३९) | | |
| | २०- इतर प्रशासकीय खर्च | ७००.००० | ५६.००० |
| | ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) | १५०००००.००० | १०५०००.००० |

२. संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयान्वये, आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “नियंत्रक अधिकारी” आणि सहाय्यक संचालक, दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “आहरण व संवितरण अधिकारी” घोषित करण्यात आले आहे.

३. वित्त विभाग शासन निर्णय, दिनांक १२.०१.२०२३ नुसार सदरचे अर्थसहाय्य बिनशर्त आहे. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५, दि.१२.०३.२०२५ मधील परि.क्र. ९ अन्वये वैयक्तिक लाभार्थ्यांना प्रदान करावयाच्या प्रयोजनार्थ राज्याच्या एकत्रित निधीमधून रकमा आहरित करण्यात याव्यात.

दिव्यांग व्यक्तींकरीता विशेष सहाय्य योजने अंतर्गत अनुदानाची रक्कम VPDA खात्यावर वर्ग करून संवितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर ज्ञापन वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०८२४१८१७०७७३३५ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

SAIPRASAD
DATTAGOUD
MUKDADWAR

Digitally signed by SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=DEPwD, 2.5.4.20=1FD0BA050AFD8B541478DADD67654A462394D4B092AA83CF80DC3EB2722EF7F1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B36F2DE828CF58932F62F0A5F9320AC750FBA48646152A059F8C4D72B27812AB, cn=SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR
Date: 2026.08.24 18:18:27 +05'30'

**( साईप्रसाद द. मुकदाडवार )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :

१. मा. मंत्री (दिव्यांग सक्षमीकरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
४. सचिव, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
५. सचिव (लेखा व कोषागारे), नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई-३२
८. संचालक, महाआयटी कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई

९. महालेखापाल, महालेखाकार कार्यालय (लेखापरिक्षा/ लेखा अनुज्ञेयता) १-२/ मुंबई/ नागपूर
१०. वित्त विभाग, अर्थसंकल्प ३, ४, ५ आर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
११. सर्व जिल्हाधिकारी
१२. सर्व उप सचिव/ अवर सचिव, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व तहसिलदार
१४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई-३२ (२ प्रती)
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१६. निवासी लेखाधिकारी, मुंबई-३२
१७. सर्व कक्ष अधिकारी, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती, कार्यासन-६